# मेट्रो ३ : आज दुसरा बोगदाही होणार पूर्ण

**मुंबई** : मुंबईकरांच्या प्रवासामध्ये भविष्यात आमूलाग्र बदल घडवणाऱ्या कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णत : भुयारी मेट्रो मार्गाच्या मरोळ येथील दुसऱ्या बोगद्याचे काम बुधवारी पूर्ण होणार आहे. सकाळी १० च्या सुमारास एका टोकापासूनचे अंतर पार करून दुसऱ्या टोकापर्यंतचा टप्पा गाठत टीबीएम मशीन बाहेर पडणार आहे. सप्टेंबर महिन्यात पाली मैदान ते विमानतळ येथील पहिल्या बोगदयाचे काम पूर्ण करण्यात आले होते. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गिकेचे भूगर्भातील काम अत्यंत वेगाने व नियोजनात्मक पद्धतीने पूर्ण करण्यात येत आहे. ऑगस्ट महिन्यात सारीपूत नगर येथून टीबीएम मशीनने खोदकाम सुरू केले होते. सारीपूत नगर ते सीप्झपर्यंत ५५२ मीटरचे खोदकाम पूर्ण करण्यात आले आहे. पॅकेज ६ मधील पाली मैदान ते अंधेरी पूर्व आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ हा पहिला बोगदा खणण्यासाठी २५९ दिवसांचा कालावधी लागला होता. १.२६ किमी बोगदा खणण्यासाठी २५० इंजिनीयर, कुशल कामगारांच्या सहाय्याने पहिला बोगदा वेळेत पूर्ण करण्यात आला होता. मेट्रो ३ संपूर्ण प्रकल्पासाठी सध्या या मार्गिकेदरम्यानच्या विविध ठिकाणच्या शाफ्टमध्ये १६ टीबीएम मशीन कार्यान्वित आहेत. दर दिवसाला ५ मीटर बोगदा खणण्याचे काम या मशीनच्या माध्यमातून करण्यात येते. एकूण ५२.२१ किमीपैकी १०.९५ किमी बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. तर बोगदयाच्या आतील कॉंक्रीट अस्तरीकरणाच्या ३७ हजार ४३३ रिंगपैकी १९ हजार २५३ रिंग बसवण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.